महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

# ३० मार्च रोजी ऍक्वा लाईन मार्गिकेवर दर ८ मिनिटांनी मेट्रो सेवा सकाळी ८ ते दुपारी २ वाजता दरम्यान उपलब्ध राहणार सुविधा



नागपूर : दिनांक ३० मार्च रोजी मा. प्रधानमंत्री नागपूर शहरात येत असून ऍक्वा लाईन मार्गिकेवरील वासुदेव नगर मेट्रो स्टेशन जवळील माधव नेत्रालयचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमस्थळी नागरिकांची होणारी गर्दी बघता महा मेट्रोच्या वतीने ऍक्वा लाईन मार्गिकेवर सकाळी ८ ते दुपारी २ वाजता दरम्यान दर ८ मिनिटांनी अप आणि डाऊन लाईन मार्गिकेवर मेट्रो सेवा

नागरिकांनकरिता उपलब्ध असेल. उल्लेखनीय आहे कि,माधव नेत्रालय हे स्थळ वासुदेव नगर मेट्रो स्टेशनला लागून आहे.

शहरातील अनेक नागरिकांची कार्यक्रम दिनी मेट्रोची फ्रिक्वेंसी वाढविण्याकरिता मागणी होती तसेच वाढते तापमान बघता नागरिकांच्या सोई करिता महा मेट्रोच्या वतीने मेट्रो सेवा मध्ये बदल करत दर ८ मिनिटांनी मेट्रो सेवा उपलब्ध केल्या आहेत. ऍक्वा लाईन मार्गिका प्रजापती नगर ते लोकमान्य नगर पर्यंत आहे (यामध्ये प्रजापती नगर,वैष्णो देवी चौक,आंबेडकर चौक, टेलिफोन एक्सचेंज, चितार ओळी चौक, अग्रसेन चौक, दोसर वैश्य चौक, नागपूर रेल्वे स्टेशन, कॉटन मार्केट,सिताबर्डी इटरचेंज, झाशी राणी चौक, इन्स्टिट्यूट ऑफ इंजनिअर्स, शंकर नगर चौक, एलएडी चौक, धरमपेठ कॉलेज, रचना रिंग रोड जंक्शन, वासुदेव नगर, बंसी नगर, लोकमान्य नगर मेट्रो स्टेशनचा) समावेश आहे.कार्यक्रमाच्या तसेच सुरक्षेच्या दृष्टीने रस्त्यावरील ट्रॅफिक जाम टाळण्यासाठी महा मेट्रोच्या सेवांचा वापर करून कार्यक्रम स्थळी सहजपणे पोहोचता येईल. महा मेट्रो नागरिकांना रस्त्यांवरील गर्दी टाळण्यासाठी आणि जलद प्रवासासाठी मेट्रो वापरण्याचे आवाहन करत आहे.